**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२९/२०१४</u>**
विष्णू वि. बाळकृष्ण
निशाण क्र. १००

**<u>उलट तपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. ए.जी.पालव यांचेमार्फत शपथेवर सरु.</u>**

२५. माझे शिक्षण जुनी ११ वी पर्यंत झालेले आहे. मी टाटा मोटर्स पिंपरी चिंचवड पुणे येथे नोकरीस होतो. माझा जन्म पुणे येथे झाला असून मी जन्मापासून पुणे येथे राहण्यास आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आधारकार्ड, मतदान कार्ड व पॅन कार्डवर पुणे येथील पत्ता आहे. मला दावा मिळकतीचा तपशिल सांगता येईल. दावा मिळकतीचा स.नं. ४० क्षेत्र १३.१ गुंठे व आकार ०–१८ पैसे असा आहे. मला दावा मिळकतीचा हिस्सा नंबर आठवत नाही. मी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिलेला आहे.

२६. माझे जुने घर तारकर्ली काळेथर येथे आहे. त्या घराचा घर क्र. १२५ असा आहे. सदरचे घरे हे आजोबांच्या नावावर होते. त्यानंतर ते माझ्या वडीलांच्या नावावर झाले. वडील मयत झाल्यानंतर सदर घर माझ्या नावावर नोंदविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस मी पुण्यावरुन गावी येतो त्यावेळी मी घर क्र. १२५ मध्ये राहतो. वडील हयात असेपर्यंत आम्ही आमचे सर्व सण व देवपुजा हे घर क्र. १२५ मध्ये करत होतो. त्यानंतर मी पुणे येथे सण साजरे करतो. त्यानंतर मी गणपती पुजन व इतर देवकार्य देखील पुणे येथे करतो. हे म्हणणे खरे आहे की, पुणे वरुन मालवण येथे येणे शक्य नसल्याने मी माझे देवकार्य पुणे येथे करतो. हे म्हणणे खरे आहे की, पुणे येथे माझे स्वत:च्या मालकीचे घर आहे.

२७. मी दावा दाखल करण्यापुर्वी दावा मिळकतीचे ७/१२ पाहिले होते. मला ७/१२ कसा वाचतात याचे ज्ञान नाही. मी दावा दाखल झाल्यानंतर दावा मिळकतीचे ७/१२ व फेरफार स्वत: पाहिलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादी व त्यांचे कुटूंबियाचे नाव ७/१२ सदरी संरक्षित कुळ म्हणून सन १९४८ पासून आहे. वादी व त्यांचे कुटूंबियाचे संरक्षित कुळ म्हणून ७/१२ ला नोंद नाही. साक्षीदारास नि.क्र.११७ येथील ७/१२ उतारा_दाखविण्यात आला. साक्षीदार नि.क्र. ११७ पाहून सांगतो की, वादी व त्यांचे कुटूंबियांचे नाव ७/१२ सदरी संरक्षित कुळ म्हणून दिसत आहे. साक्षीदार नि.क्र. ११७ पाहून सांगतो की, ७/१२ सदरी जमिन कसणाऱ्याचे रखान्यामध्ये संरक्षित कुळ अशी सन १९९१–९२ ते सन २०१६–१७ पर्यंत नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या ७/१२ वर कृष्णा वासूदेव पाटकर यांचे नाव

संरक्षीत कुळ म्हणून फेरफार क्र. ५४९८ अन्वये सन १९४८ पासून दाखल होते. हे मला माहित नाही की, कृष्णा वासू पाटकर हे वादींचे आजोबा होते किंवा कसे. साक्षीदारास नि.क्र. ११८ दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णा वासूदेव पाटकर हे मयत झाल्यानंतर त्याचा वारस तपास होवून वादी व त्यांचे कुटूंबियाचे नाव ७/१२ सदरी फेरफार क्र. ९२ अन्वये नोंद करण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, मी फेरफार क्र. ५४९८ व फेरफार क्र. ९२ रद्द करण्यासाठी कोणतेही अपिल केलेले नाही.

२८. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही माडबाग असल्याने त्याची विक्री तहकूब होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये माझे व माझ्या वडीलांचे नाव घर व मांगर असे काही नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये विष्णू वासूदेव पाटकर यांच्यापासून चालत आलेले घर क्र. १३० हे आहे. हे म्हणणे खरे आहे की, घर क्र. १३० पुढे बदलून घर क्र. १४५ होवून ते घरास भागेश्वर कृष्णा मेस्त्री यांच्या नावाची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, भागेश्वर कृष्णा मेस्त्री मयत झाल्यानंतर भागिरथी भागेश्वर मेस्त्री यांच्या नावे नोंद झाले आहे. सदर घर क्र. १४५ चा आताचा घर क्र. १५९ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घर क्र. १५९ हे भागिरथी भागेश्वर मेस्त्री यांच्या नावावर नोंद आहे.

२९. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही पुर्वी माडबाग होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस दावा मिळकतीमध्ये ११ माड लावलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माड बागायतीचे उत्पन्न वादी कुटूंबिय घेत होते. मी वादी कुटूंबिय माडबागायतचे उत्पन्न घेत नव्ळते याबाबतचा पुरावा कोर्टात दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीला तीन बाजूने कंपांउंड आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या पुर्व बाजूस मालवण देवबाग जाणारा मुख्य रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या पश्चिम बाजूस पुर्वी पाणंद रस्ता होता. हे म्हणणे खरे आहे की, वादी कुटूंबिय पुर्वीपासून मेस्त्री काम करतात. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे वादी कुटूंबाला मेस्त्री आडनावाने गावात ओळखत होते. हे म्हणणे खरे आहे की, वादी कुटूंबिय मागील कित्येक वर्षापासून घर क्र. १५९ मध्ये राहतात. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये पुर्वी एक विहिर होती. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी दावा मिळकतीमध्ये बोअरवेल आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर बोअरवेल ही वादी कुटूबियांनी पाडलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी कुटूंबिय सदर बोअरवेलाचा वापर पिण्याच्या पाणी तसेच झाडांसाठी वापरतात. हे म्हणणे खरे आहे की, सदर बोअरवेलवर असलेला पंप वादी

कुटूंबियांनी बसविलेला आहे. हे मला माहित नाही की, दावा मिळकतीमध्ये वादींनी पर्यटकांसाठी ६ रुम काढलेल्या आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळक्तीमध्ये जात नसल्याने मला दावा मिळकतीमध्ये वादींनी ६ रुम काढले आहेत किंवा कसे हे म्हणणे खोटे आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी वादींच्या २ गुंठयामध्ये जात नसल्याने मला वादींचे ६ रुम आहेत किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादींचे घर हे दावा मिळकतीच्या पश्चिम बाजूला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादींना त्यांच्या घरामध्ये जाण्यासाठी पुर्व दिशेला असलेल्या मालवण देवबाग मुख्य रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या घराकडे जाण्यासाठी पुर्व दिशेने रस्ता आहे तो पिढयानंपिढया पासून सुरु आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व वादींचे पर्यंटक हे गाडीने पुर्व दिशेला असलेल्या मालवण देवबाग मुख्य रस्त्यापासून ये जा करतात.

३०. हे मला माहित नाही की, दावा मिळकत माझे आजोबा कुळ कायदयाच्या कायदयाअन्वेय खरेदी करण्यास इच्छूक नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, कुळ कायदयाखाली खरेदी निरर्थक ठरविण्यासाठी फेरफार क्र. १०७१४ नोंदविण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या मुळ आदेशाविरुध्द मी किंवा माझे पुर्वाधिकारी यांनी अपिल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे मुळ मालक मुकूंद शंकर सारंग हे होते. हे म्हणणे खरे आहे की, मुकूंद शंकर सारंग मयत झाल्यानंतर त्याचे वारय तपास होवून वासूदेव मुकूंद सारंग यांचे नाव ए.कु.पु. म्हणून फेरफार क्र. ४७ अन्वये नोंद झाली. हे मला माहित नाही की, दावा मिळकतीचे मालकांनी वादी कुटूंब संरक्षित कुळ असल्याबाबत हरकत घेतली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत वादींच्या नावे होण्यासाठी वादींनी टेनन्सी कोर्टात अर्ज केला असून तो आजरोजी प्रलंबित आहे.

३१. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर दाव्यात हजर होवून २५/०३/२०१४ रोजी माझी कैफियत दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, कैफियत दाखलकरताना वाद विषयाचे संपुर्ण माहिती मी स्वत: घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमधील माझा कायम कुळ हक्क मी दि. ३०/०१/२०१८ रोजी कक्षा कांचन खराडे यांना विकलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दि. ०३/०१/२०१८ रोजीचे खरेदीखत पूर्ण वाचून सही केलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखताचा मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला होता.

हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतामध्ये दावा मिळकतीविषयी कोणताही दावा प्रलंबित नाही असा मजकूर लिहिला होता. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतामध्ये नमूद मजकूर की, दावा मिळकतीवर दवा प्रलंबित नाही हा मजूर खोटा लिहिलेला होता.

३२. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्याच्या अभिलेखावर मी भावाचे कुलमुखत्यार पत्राची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. सदर कुलमुखत्यारपत्राची मुळ प्रत हजर करण्यासा माझा कोणतीही अडचण नव्हती. मी अजित गणपत भोगवेकर माझ्यासाठी काम करत होता हे दाखविण्यासाठी मी त्याला हजर करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, अजित गणपत भोगवेकर हा दावा मिळकतीमध्ये कधीही काम करण्यासाठी आलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, अजित गणपत भोगवेकर माझ्यासाठी दावा मिळकतीमध्ये काम करत होता हे मी खोटे सांगतले आहे.

३३. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीची मोजणी करण्यासाठी दि. ०२/०२/२०१४ रोजी पैसे भरुन नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणीस वादींनी हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, वादीनी हरकत घेतल्यामुळे ती मोजणी रद्द करण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी मोजणीसाठी पुन्हा अर्ज केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या समोरच्या बाजूला मी जबरदस्तीने कुंपण घालण्याचा प्रयत्न केला. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये मी बेकायदेशीरपणे घुसण्याचा प्रयत्न केले होते.

३४. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये वादी कुटूंबाची संपुर्ण वहिवाट असून माझा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये असलेले माडाचे उत्पन्न वादी कुटूंबिय घेत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे उत्पन्न घेण्यासाठी मी दावा मिळकतीमध्ये कधीही गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्यामध्ये खोटी कैफियत देवून खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत हडपण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेर तपास नाही. श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह

दि. ०८-०९-२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण.